# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

जा.क्र.झोपुप्रा/कायदा/कापव्य-३४/२०१८
दि.०६/०४/२०१८

**कार्यालयीन परिपत्रक क्र.२४७** (०८/२०१८)

विषय :- सर्व झोपडपट्टी पुनर्वसन योजना महारेराशी जोडणेबाबत.

संदर्भ :- अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र.झोपुयो-१२०३/सं.क्र. व्हिआयपी २५३/२०१८/झोपसु-१, दि.२५/०१/२०१८ रोजीचे पत्र.

स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा, २०१६ केंद्र शासनाने दिनांक २६ मार्च २०१६ रोजी पारित केला असून सदर कायद्याच्या तरतुदी दिनांक १ मे २०१७ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र स्थावर संपदा विनियमन प्राधिकरण (महारेरा) दिनांक ८ मार्च २०१७ रोजी अस्तित्वात येऊन त्यान्वये पारित केलेले नियम दिनांक १ जुलै २०१७ पासून संपुर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये लागू करण्यात आलेले आहे. सदर कायद्यातील तरतुदीनुसार स्थावर संपदा प्रकल्पाची नोंदणी स्थावर संपदा प्राधिकरणाकडे करणे अनिवार्य आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील पुनर्वसन योजना राबविताना ज्या योजनेअंतर्गत विकसकाने, खुला विक्री घटक प्रस्तावित केला आहे अशा विकसकास झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना त्यांच्या प्रकल्पांची नोंदणी स्थावर संपदा प्राधिकरणाकडे करणे आवश्यक आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेतर्फे मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली म्हाडा कार्यालयात दि.२१/०२/२०१८ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये पुनर्वसन प्रकल्पांचा आढावा घेताना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामाला शिस्त लावण्याच्या तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजना निश्चित कालमर्यादेमध्ये पूर्ण करण्याचे उद्देशाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रस्ताव महारेराशी जोडण्याबाबत चर्चा होवून झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची नोंदणी स्थावर संपदा प्राधिकरणाकडे नोंदविणे अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या निर्देशानुसार प्रस्तुत परिपत्रकाद्वारे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल करण्यात येणाऱ्या पुनवर्सन प्रकल्पांचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर ज्या प्रकल्पांर्गत खुल्या विक्री घटकांची योजना समाविष्ट आहे अशा प्रकल्पांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची एसआर ४(५) अन्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष नकाशानुसार बांधकाम सुरू करण्याचा दाखला (Commencement Certificate) देण्यापुर्वी सदर प्रकल्पाची नोंदणी स्थावर संपदा प्राधिकरणाकडे (महारेरा) करणे अनिवार्य करण्यात आले असून असे नोंदणीचे प्रमाणपत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल केल्यानंतरच बांधकाम सुरू करण्याचा दाखला (Commencement Certificate) देण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(पांडुरंग पोले)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

प्रत -

१) सचिव, झो.पु.प्रा.,पुणे

२) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी १,२,३

३) तांत्रिक शाखा, झो.पु.प्रा.,पुणे

४) ताबा शाखा, झो.पु.प्रा.,पुणे

५) सहाय्यक निबंधक, झो.पु.प्रा.,पुणे

६) विधी अधिकारी, झो.पु.प्रा.,पुणे

७) लेखा शाखा, झो.पु.प्रा.,पुणे

८) जनसंपर्क अधिकारी शाखा, झो.पु.प्रा.,पुणे

९) आदेश नस्ती

९७